**ठळक बातम्या**

- देशाच्या विकासासाठी आवश्यक प्रत्येक गोष्ट देशातच तयार व्हावी, ही काळाची गरज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या माध्यमातून विभागातल्या प्रत्येक गावात येत्या पाच वर्षात पाणी पोहोचेल, अशी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची ग्वाही

- मुंबईसह महाराष्ट्रात सर्वत्र मुसळधार पाऊस, प्रशासनाला सज्ज राहण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचना

**आणि**

- आंध्र प्रदेशात कार आणि ट्रकच्या अपघातात चार जणांचा मृत्यू

**<><><><><><>**

देशाच्या विकासासाठी आवश्यक सर्व गोष्टी देशातच तयार व्हाव्यात, ही काळाची गरज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदी यांनी २०१४ मध्ये भारताचे प्रधानमंत्री म्हणून शपथ घेतल्याला आज ११ वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्त गुजरातमधे दाहोद इथं झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी रेल्वे इंजिन प्रकल्पासह, सुमारे २४ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण मोदी यांच्या हस्ते झालं. देशातलं औद्योगिक उत्पादन आणि निर्यातही सातत्यानं वाढत असल्याचं त्यांनी सांगितलं. अनेक वस्तूंसह रेल्वे आणि मेट्रोचं तंत्रज्ञानही आपण इतर देशांना निर्यात करू लागलो असल्याचं ते म्हणाले.

गेल्या काही वर्षात देशानं दशकांच्या बेड्या झुगारणारे अभूतपूर्व निर्णय घेतले आहेत असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

यानंतर भूज इथं त्यांनी ५० हजार कोटींपेक्षा जास्त रकमेच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन, भूमीपूजन आणि लोकार्पण केलं. या प्रकल्पांमुळे भारताला नील अर्थव्यवस्था आणि हरित उर्जेचं जागतिक केंद्र होण्यात मदत होईल, असं त्यांनी सांगितलं. येत्या काळात हरित उर्जा महत्वाची ठरणार आहे, त्या अनुषंगानंच आज पायाभरणी केलेल्या हरित हायड्रोजन कारखान्यामुळे कच्छ हे हरित उर्जेचं जगातलं सर्वात मोठं केंद्र म्हणून उदायाला येईल, असं ते म्हणाले. जगातल्या सर्वात मोठ्या सौर ऊर्जा केंद्रांपैकी एक केंद्र कच्छमध्ये उभारलं जात प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या माध्यमातून विभागातल्या प्रत्येक गावात येत्या पाच वर्षात पाणी पोहोचेल, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्रात नांदेड इथं हरित क्रांतीचे जनक तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा आणि परिसर सुशोभिकरण कामाचं लोकार्पण शहा यांच्या हस्ते आज झालं. त्यानंतर झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. कोकण आणि कृष्णा खोऱ्यातलं वाहून जाणारं पाणी मराठवाड्यासाठी वळवण्याचं नियोजन करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे, मंत्री पंकजा मुंडे, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

त्याआधी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते नागपूरजवळ जामठा इथल्या राष्ट्रीय कर्करोग संस्थेत स्वस्ती निवासचं भूमिपूजन तसंच कामठी इथं राष्ट्रीय न्यायवैद्यक विद्यापीठाची पायाभरणी झाली.

**<><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार

पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं कतारमध्ये दोहा इथं शूरा परिषदेच्या उपसभापती डॉ. हमदा अल सुलैती आणि इतर कतारी खासदारांची भेट घेतली. शिष्टमंडळानं कतारच्या विधिमंडळाला ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती दिली आणि दहशतवादा विरुद्धच्या जागतिक लढाईत पाठिंबा देण्याचं आवाहन केलं. हे शिष्टमंडळ येत्या काही दिवसांत दक्षिण आफ्रिका, इथिओपिया आणि इजिप्तला भेट देणार आहे. खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं बहरीनच्या शूरा कौन्सिलचे अध्यक्ष आणि उपप्रधानमंत्र्यांची भेट घेतली. खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं दक्षिण कोरियाला भेट दिली. खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं, न्यूयॉर्क इथं ९/११ स्मारकाला भेट देऊन दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना श्रद्धांजली वाहिली. **द्रविड** मुनेत्र कळघम पक्षाच्या खासदार कनिमोळी यांच्या अध्यक्षतेखालच्या शिष्टमंडळानं मॉस्को दौरा यशस्वीपणे पूर्ण केला असून आता ते स्लोव्हेनियाकडे रवाना झाले आहेत. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त अरब अमिरातला गेलेल्या शिष्टमंडळानं आपला दौरा पूर्ण केला असून ते आता काँगोमध्ये पोहोचले आहेत.

**<><><><><><>**

जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरणाच्या छत्तीसाव्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईत आज प्राधिकरणावरच्या एका कॉफी टेबल बुकचं अनावरण केंद्रीय बंदरे, जहाज आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते झालं. जगातील पाच महत्वाच्या सागरी देशांच्या पंक्तित जाण्याचं भारताचं उद्दिष्ट आहे असं सांगत वाढवण बंदर हे त्या दृष्टीने महत्वाचं असल्याचं सोनोवाल म्हणाले. वाढवण बंदर येत्या दहा वर्षात पूर्ण होईल. ३० कोटी कार्गो हाताळणीची या बंदराची क्षमता असेल आणि हे बंदर जगातील दहा बंदरांमधील एक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><><>**

महाराष्ट्रात सर्वत्र जोरदार पाऊस होत असून नैऋत्य मोसमी पावसानं १०७ वर्षांचा विक्रम मोडत राज्यात वेळेआधीच प्रवेश केला आहे. पुणे, सातारा, सोलापूर, रायगड, मुंबई आणि उपनगर भागात अतिवृष्टी झाली आहे. राज्यात येत्या २ दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र, आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी तर विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. **मुंबईत** २४ तासात सुमारे १३५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसानं शहरातलं जनजीवन विस्कळीत झालं आहे. सखल भागांत, तसंच रेल्वेरुळांवर पाणी भरलं आहे. विमानांची उड्डाणंही उशिरानं सुरू आहेत. शहरातल्या ९६ धोकादायक इमारतींमधल्या तीन हजारापेक्षा जास्त लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे. हवामान विभागानं आज मुंबईसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. पुढच्या २४ तासांत जोरदार पावसाची शक्यता असून नागरिकांना सतर्क राहण्याची सूचना देण्यात आली आहे. **रायगडमध्ये** वीज पडून एकाचा मृत्यू झाला आहे. **सिंधुदुर्ग जिल्ह्यात** एकूण ५९ गावांना अतिवृष्टीचा फटका बसला असून अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात अंदाजे २१ लाख रुपयांचं नुकसान झालं आहे. **पुणे जिल्ह्यात** दौंडमध्ये ११७ मिलिमीटर, बारामतीत १०५ मिलीमीटर, इंदापुरात ६३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. राज्यातल्या पावसाच्या स्थितीचा **मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी आज आढावा घेतला. त्यांनी संपूर्ण प्रशासनाला अलर्ट राहण्याच्या सूचना त्यांनी आहेत. नुकसानग्रस्त भागात तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

**<><><><><><>**

विकसित भारताचा मार्ग शेतकऱ्यांच्या शेतातून आणि गावांतून जातो असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. धनखड यांनी आज मध्यप्रदेशात नरसिंगपूर इथं आयोजित तीन दिवसीय कृषी उद्योग संमेलनाचं उद्घाटन केलं

त्यावेळी ते बोलत होते. शेतकऱ्यांनी केवळ उत्पादन घेण्यापुरतं मर्यादित न राहता, व्यवसाय क्षेत्रातही उतरायला हवं, यामुळं त्यांच्या उत्पन्नात मोठा बदल घडून येईल, आणि ते मोठ्या अर्थव्यवस्थेशी जोडले जाऊ शकतील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या कलोजियमने सर्वोच्च न्यायालयातल्या तीन नेमणुकांसाठी न्यायाधिशांची नावाची शिफारस केली आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एन व्ही अंजारिया, गौहत्ती उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश विजय बिष्णोई आणि मुंबई उच्च न्यायालयातील अतुल एस. चंदावरकर या तिघांची नावं शीर्ष कलोजियमने केंद्रीय कायदे आणि न्याय मंत्र्यांकडे सुपूर्द केली आहेत. प्रधानमंत्र्यांच्या मंजुरीनंतर राष्ट्रपतींकडे या नावांची शिफारस केली जाईल.

**<><><><><><>**

कोविडसंसर्गाच्या रुग्णांमधे देशाच्या दक्षिण भागात प्रथम वाढ दिसून आली, नंतर पश्चिम आणि आता उत्तर भारतात कोविडचे रुग्ण वाढत असल्याचं दिसून आलं आहे. इंडियन काऊन्सिल ऑफ मेडीकल रिसर्चचे महासंचालक डॉ. राजीव बहल यांनी पीटीआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ही माहिती दिली.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स या संघांचा सामना जयपूरला सवाई मानसिंग स्टेडीयमवर सुरु आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हां मुंबई इंडियन्सच्या ८ षटकांत १ बाद ६४ धावा झाल्या आहेत.

<><><><><><>

देशातल्या मध्यम उद्योगांसाठी धोरण तयार करण्याच्या दृष्टीनं एक अहवाल नीती आयोगाने आज प्रसिद्ध केला. मध्यम उद्योग देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचे इंजिन बनावेत या करता आवश्यक शिफारशी या अहवालात आहेत.

<><><><><><>

राज्यसभेच्या आठ जागांसाठी १९ जूनला मतदान घेणार असल्याची घोषणा निवडणूक आयोगाने आज केली. आसाममधल्या दोन राज्यसभा खासदारांची मुदत १४ जूनला तर तामिळनाडूमधल्या सहा राज्यसभा खासदारांची मुदत २४ जून रोजी संपणार आहे.

<><><><><><>

आंध्र प्रदेशातल्या राजामहेंद्रवरम इथं झालेल्या कार आणि ट्रकच्या अपघातात चार जणांनी आपले प्राण गमावले. ही कार दिवाण चेरुवू इथून कोव्वुर ला जात असताना हा अपघात झाला. कारमधल्या तिघांचा जागीच मृत्यू झाला तर एक जण उपचारा दरम्यान मरण पावला. आंध्रप्रदेशचे परिवहन मंत्री एम रामप्रसाद रेड्डी आणि खासदार डी पुरंदेश्वरी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या नातेवाईकांना आवश्यक ती मदत करण्याचं आश्वासन दिलं आहे.

//<><><><><><>//